Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ । अंक ११५। पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

रावेरमध्ये अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात

(पान २ वर)



» Selected

### म्युनिसिपल हायस्कूलमध्ये अण्णाभाऊ साठे जयंती

**भुसावळ:** नगरपरिषद संचलित म्युनिसिपल हायस्कूल, भुसावळ येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन व आदरांजली कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक व्ही. पी. सुलताने होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक व्ही. पी. सुलताने यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस, तर सेवाज्येष्ठ शिक्षिका सरला सावकारे यांनी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. विद्यार्थ्यांनी दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. संध्या धांडे, डॉ. प्रदीप साखरे आणि संजीव चौधरी यांनी विद्यार्थ्यांना अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक व सामाजिक कार्याची तसेच लोकमान्य टिळक यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाची माहिती दिली.

## जातीची काढली गेली उणीदुणी, तणाव निवळण्यासाठी सलोखा परिषद

# उपवर्गीकरण प्रकरण: बौद्ध आणि मातंग समाजामध्ये तणाव!

## अनुसूचित जात प्रवर्गाच्या १३ टक्के आरक्षणाचे अ, ब, क, ड असे राज्यात वर्गीकरण

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई । अनुसूचित जात प्रवर्गाच्या १३ टक्के आरक्षणाचे अ, ब, क, ड असे राज्यात वर्गीकरण होऊ घातले असून त्याप्रकरणी बौद्ध आणि मातंग समाजाच्या परस्पर विरोधात भूमिका असल्याने दोन्ही समाजामध्ये दरी वाढली आहे. दोन्ही बाजुचे नेते, कार्यकर्ते समाजमाध्यमांवर शिवराळ भाषेत आरोप करत असून अनेक जिल्ह्यात गुन्हे नोंद झाले आहेत.**

दरी कमी करण्यासाठी ‘सलोखा’ परिषदा घेतल्या जात आहेत. उपवर्गीकरणविषयी न्या. बदर समितीच्या शिफारशी गुलदस्त्यात आहेत. त्यावर लाखभर हरकती व सूचना प्राप्त झाल्या असून सुनावणी घेण्यासाठी मुख्य सचिवांची समिती गठीत केली आहे. अनुसूचित जात प्रवर्गात ५९ जाती असून २०११ च्या जनगणनेनुसार राज्यात या प्रवर्गाची ११ टक्के लोकसंख्या आहे. त्यामध्ये बौद्ध (६२ टक्के), मातंग (१९ टक्के) आणि चर्मकार (१० टक्के) या तीन मोठ्या जाती आहेत. पैकी बौद्ध आणि चर्मकारांचा उपवर्गीकरणाला विरोध असून मातंग समाजाची उपवर्गीकरणाची आग्रही मागणी आहे.



दोन महिने बौद्ध आणि मातंग समाजाकडून याप्रकरणी निषेध आणि पाठिंब्याचे मोर्चे काढले जात आहेत. १५ जिल्ह्यात मोर्चे निघाले असून निळ्या आणि पिवळा झेंड्याची सरळसरळ विभागणी झाली आहे. समाजमाध्यमांवर भूमिका मांडणाऱ्या नेत्यांना ‘ट्रोल’ केले जात आहे. दलित आंदोलनातील सहभागाविषयी जातीय उणीदुणी काढली जात आहेत. पुणे, परभणी, नांदेड, ठाणे आणि पिंपरी-चिंचवड येथे गुन्हे नोंद आहेत. दोन्ही समाजातील वाढती दरी कमी करण्यासाठी पुण्यातून ‘सलोखा’ परिषदांची सुरुवात झाली आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेची अंतिम मुदत १० ऑगस्टपर्यंत; एल निनोच्या पार्श्वभूमीवर कृषिमंत्री भरणे यांचे महत्त्वाचे आवाहन ॲड.प्रकाश आंबेडकर, मंत्री रामदास आठवले आणि ‘बामसेफ’चे वामन मेश्राम यांनी कायदेशीर चौकटीत उपवर्गीकरण करण्यास पाठिंबा दर्शवला आहे, तरी कार्यकर्त्यांची हिंसक भाषा कमी झाली नाही. दलित चळवळीत काही दशके सोबत काम केलेले कार्यकर्ते परस्परविरोधी भूमिका घेऊन उभे ठाकले आहेत. उपवर्गीकरणाला पाठिंबा दर्शवणाऱ्या बौद्ध कार्यकर्त्यांना बौद्ध समाजातून कॉंम्रेड, लाल्या म्हणून हिणवले जात आहे. ट्रोलचे प्रकार वाढू लागल्याने कवयीत्री प्रज्ञा दया पवार, विचारवंत गौमतीपुत्र कांबळे यांना आवाहन करण्याची वेळ ओढावली.

> दोन्ही समाजातील वाढती दरी कमी करण्यासाठी पुण्यातून सलोखा परिषदेने सुरुवात केली आहे.
> -**सचिन बगाडे, अध्यक्ष,** सत्यशोधक बहुजन आघाडी, पुणे.

> उपवर्गीकरणाच्या लाभाची चर्चा बाजुला ठेवून दोन्ही समाजाकडून एकमेकांच्या जातीवर टिप्पणी केली जात आहे.
> -**राहूल डंबाळे,** अध्यक्ष, रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टी, पुणे.

> सामाजिक लढ्यात आघाडीवर असलेल्या मातंग आणि बौद्ध जातींमध्ये ध्रुवीकरण करण्यात सरकार यशस्वी झाले.
> - **कॉं. सुबोध मोरे,** अण्णाभाऊ साठे चरित्राचे अभ्यासक, मुंबई.

> उपवर्गीकरणासंदर्भात बौद्ध नेते सरकारशी भांडायचे सोडून ते मातंग समाजाला शिव्या देत आहेत.
> -**मारोती वाडेकर,** सकल मातंग समाज, नांदेड.

# अनुसूचित जाती उपवर्गीकरणाला समता सैनिक दलाचा तीव्र विरोध

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा । (प्रतिनिधी):** अनुसूचित जाती (SC) प्रवर्गात उपवर्गीकरण करण्याच्या राज्य शासनाच्या हालचालींविरोधात समता सैनिक दलाने तीव्र भूमिका घेतली आहे. उपवर्गीकरण हा भारतीय संविधानातील समतेच्या तत्त्वाविरुद्धचा प्रयत्न असून, समाजात कृत्रिम फूट पाडण्याचा डाव असल्याचा आरोप समता सैनिक दलाचे जळगाव जिल्हाध्यक्ष मार्शल किशोर डोंगरे यांनी केला. पाचोरा येथे आयोजित बैठकीत बोलताना डोंगरे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुसूचित जातींना समान न्याय आणि समान संधी मिळावी या उद्देशाने संविधानात आरक्षणाची तरतूद केली आहे. अशा परिस्थितीत अनुसूचित जातींमध्ये 'अ, ब, क, ड' अशा प्रकारचे उपवर्गीकरण करणे हे संविधानाच्या समतेच्या भावनेलाच छेद देणारे आहे. समाजात अविश्वास, तेढ आणि अंतर्गत संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असून सामाजिक



ऐक्य धोक्यात येऊ शकते, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी उपवर्गीकरणाची मागणी करणाऱ्या नेत्यांवरही टीका करत, विविध महामंडळांमधील भ्रष्टाचार, निधीचा गैरवापर आणि योजनांच्या अपुऱ्या अंमलबजावणीसारख्या प्रश्नांवर प्रथम भूमिका घ्यावी, असे आवाहन केले. महात्मा फुले महामंडळ आणि चर्मोद्योग महामंडळातील निधी पारदर्शकपणे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रश्नांचे निराकरण विभाजनातून नव्हे, तर शिक्षण, रोजगार, आर्थिक सबलीकरण आणि संविधानिक मूल्यांच्या प्रभावी अंमलबजावणीतून होऊ शकते, असे सांगत समता सैनिक दल महाराष्ट्रात सामाजिक ऐक्य, बंधुता आणि संविधानिक मूल्यांचे रक्षण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. बैठकीस समता सैनिक दलाचे आयु. अरुण खरे, अभिमान बाविस्कर, सुकलाल पवार, अलकाताई मोरे, शशीकांत मोरे, पाचोरा तालुकाध्यक्ष पिटू सावळे, अजय संसारे, दशरथ तांबे, शहराध्यक्ष प्रवीण वाघ यांच्यासह जिल्हा व तालुकास्तरीय पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी अनुसूचित जाती उपवर्गीकरणाला एकमुखी विरोध दर्शवत सामाजिक ऐक्य टिकवण्यासाठी संविधानाच्या चौकटीत व्यापक जनजागृती आंदोलन उभारण्याचा निर्धार व्यक्त केला.

# रावेर-यावल मतदारसंघात अतिवृष्टीचा तडाखा

## आ. अमोल जावळे यांनी बाधित भागांची पाहणी

जन सम्राट टाईम्स

रावेर/यावल | प्रतिनिधी गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे रावेर-यावल विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतपिके पाण्याखाली गेली असून घरांची पडझड, शेतीचे नुकसान आणि जनजीवन विस्कळीत झाल्याने नागरिक संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर रावेर-यावल विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल जावळे यांनी अतिवृष्टीग्रस्त भागांचा दौरा करून परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. दौऱ्यादरम्यान आमदार जावळे यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त पिकांची पाहणी केली तसेच बाधित नागरिकांच्या घरांना भेट देऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. या कठीण काळात शासन आणि लोकप्रतिनिधी नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचा विश्वास त्यांनी नागरिकांना दिला. त्वरित पंचनामे व मदतीचे आश्वासन परिस्थितीची पाहणी केल्यानंतर आमदार अमोल जावळे यांनी संबंधित प्रशासनाशी संपर्क साधून नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना




दिल्या. तसेच शेतपिके पाण्याखाली गेली असून घरांची पडझड, शेतीचे नुकसान आणि जनजीवन विस्कळीत झाल्याने नागरिक संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर रावेर-यावल विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल जावळे यांनी अतिवृष्टीग्रस्त भागांचा दौरा करून परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. बाधित शेतकरी आणि नागरिकांना शासनाकडून योग्य व भरीव मदत मिळावी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. संकटात नागरिकांच्या पाठीशी अतिवृष्टीमुळे अडचणीत आलेल्या कुटुंबांना धीर देत, प्रत्येक बाधिताला शासनाच्या मदतीचा लाभ मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे आमदार जावळे यांनी सांगितले. त्यांच्या या दौऱ्यामुळे शेतकरी आणि नागरिकांना दिलासा मिळाल्याची भावना स्थानिकांनी व्यक्त केली.

# प्रशासनासह प्रत्येक नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे - आ. अमोल पाटील

## जिल्हाधिकाऱ्यांनी पुरग्रस्त भागाची केली पाहणी

जन सम्राट टाईम्स

पारोळा। (प्रतिनिधी) : पारोळा तालुक्यात आणि जिल्हयात सुरू झालेल्या अति मुसळधार पावसाने संपूर्ण जळगाव जिल्ह्याला अक्षरशः झोडपून काढले आहे. नद्या-नाले दुथडी भरून वाहत असून अनेक गावांमध्ये पाणी शिरल्याने जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले आहे. शेतकऱ्यांच्या हिरव्यागार शिवारांवर आज पाण्याचे साम्राज्य पसरले आहे. काबाड कष्टाने उभी केलेली पिके, संसारोपयोगी साहित्य, पशुधन आणि अनेकांचे आयुष्यभराचे कष्ट क्षणात वाहून गेल्याचे अत्यंत वेदनादायी चित्र पारोळा तालुक्यात सर्वत्र पाहायला मिळत आहे. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या समवेत पारोळा तालुक्यातील मुंदाणे प्र.उ., देवगाव, टोळी, तरडी आणि उंदीरखेडे या पूरग्रस्त गावांना भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. प्रत्येक गावात पाण्याने केलेला विध्वंस पाहून मन सुन्न झाले. अनेक कुटुंबांच्या डोळ्यांत असहाय्यतेचे अश्रू होते, तर शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर वर्षभराच्या मेहनतीवर पाणी फिरल्याची वेदना स्पष्ट दिसत होती. अशी वेळ कोणावरही येऊ नये, अशीच भावना प्रत्येक क्षणी मनात दाटून आली. या पावसामुळे टिटवी येथे सुद्धा पाचपांडव मंदिराजवळील धरण ओव्हर फ्लो झाल्यामुळे गावातील शेतकऱ्यांवर नैसर्गिक आपत्ती ओढवली गेली प्रशासनाला तातडीने मदतकार्य अधिक गतिमान करण्याच्या, नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्याच्या आणि अन्न, पिण्याचे पाणी, औषधे, पशुधनासाठी आवश्यक व्यवस्था आणि पंचनाम्यांची प्रक्रिया तात्काळ सुरू करण्याच्या स्पष्ट सूचना आमदार अमोल पाटील यांच्याकडून देण्यात आल्या, पूरग्रस्तांना



शासनाच्या सर्व मदतीचा लाभ वेळेत मिळावा यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाणार आहे असे हि त्यांनी शेतकऱ्यांना सांगितले. सध्याच्या हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील काही दिवसही मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता कायम आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, तसेच स्वतःची व आपल्या कुटुंबाची सुरक्षितता सर्वप्रथम जपावी, असे नम्र आवाहन शासनामार्फत केले जात आहे. या कठीण प्रसंगी आमदार अमोल पाटील हे स्वतः संपूर्ण प्रशासनाच्या संपर्कात असून पूरग्रस्त बांधवांच्या प्रत्येक अडचणीत आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. या संकटाच्या काळात आपण सर्वांनी एकमेकांना आधार देत, संयम आणि धैर्याने या नैसर्गिक आपत्तीवर निश्चितच मात करू. जिल्हाधिकारी रोहन घुगे, जि.प. कृषी सभापती डॉ. दिनकर पाटील, तहसीलदार डॉ. उल्हास देवरे, गटविकास अधिकारी डॉ. भुषण कदम, पोलीस निरीक्षक दिपक पवार, तालुकाप्रमुख मधुकर पाटील, समीर पाटील, आधार पाटील, डॉ. राजेंद्र पाटील, एकनाथ पाटील संबंधित ग्रामपंचायत अधिकारी, तलाठी, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दोन दिवसांच्या अतिवृष्टीचा फटका; कौली गावातील कच्च्या घराची भिंत कोसळली

## घराचे मोठे नुकसान; पंचनामा करून तातडीने आर्थिक मदत देण्याची ग्रामस्थांची मागणी

जन सम्राट टाईम्स

सोयगाव | प्रतिनिधी तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा फटका कौली गावालाही बसला असून, अतिवृष्टीमुळे एका कच्च्या घराची भिंत कोसळून मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. सततच्या पावसामुळे घरामध्ये पाणी साचल्याने मातीची भिंत कमकुवत



झाली आणि अचानक कोसळली. भिंतीचे मोठे तुकडे खाली पडल्याने घराचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून पत्र्याचे शेडही वाकले आहे. तसेच घरालगतच्या झाडाची फांदी पत्र्यावर पडल्याने नुकसानीत आणखी भर पडली. घरासमोर पाणी आणि चिखल साचल्यामुळे नागरिकांना ये-जा करण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत. घरातील साहित्याचेही नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. घटनेनंतर ग्रामस्थांनी संबंधित प्रशासनाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करावा आणि नुकसानग्रस्त कुटुंबाला शासनाकडून त्वरित आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली आहे.



# निरूळ पाडळे येथे आरक्षणाच्या उपवर्गीकरणाविरोधात जनजागृती सभा!

## रावेर तहसील कार्यालयावरील मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स



**निरूळ पाडळे|** आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या विरोधात जनजागृती करण्यासाठी उपवर्गीकरण विरोधी कृती समिती (रावेर तालुका) यांच्या वतीने शनिवारी (दि. १ ऑगस्ट) निरूळ पाडळे येथे जनजागृती सभेचे आयोजन करण्यात आले. सभेला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यावेळी प्रमुख वक्त्यांनी आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर सविस्तर मार्गदर्शन करत त्याचे सामाजिक व घटनात्मक परिणाम स्पष्ट केले. संविधानाने दिलेल्या हक्कांच्या संरक्षणासाठी समाजाने एकजुटीने उभे राहण्याची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. मान्यवरांचे मार्गदर्शन सभेत कामगार नेते दिलीप कांबळे, सामाजिक मंचाचे उमेश गाढे, वंचित बहुजन आघाडीचे माजी तालुकाध्यक्ष बाळू शिरतुरे, भारत मुक्ती मोर्चाचे महेश तायडे, ॲड. योगेश गजरे, सामाजिक कार्यकर्ते साहेबराव वानखेडे, विनोद मोरे, रवींद्र रायपुरे तसेच बीएसपीचे जाधव साहेब यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

वक्त्यांनी आरक्षणाच्या उपवर्गीकरणाविरोधातील लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला. १० ऑगस्टच्या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात १० ऑगस्ट २०२६ रोजी रावेर तहसील कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या मोर्चात निरूळ पाडळे व परिसरातील नागरिकांनी, युवकांनी आणि समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीने करण्यात आले. सभेला उपस्थित ग्रामस्थांनीही या आवाहनाला प्रतिसाद देत १० ऑगस्टच्या मोर्चात सक्रिय सहभाग नोंदविण्याचा निर्धार व्यक्त केला.

### एकजुटीने उभे राहण्याची गरज

यावेळी प्रमुख वक्त्यांनी आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर सविस्तर मार्गदर्शन करत त्याचे सामाजिक व घटनात्मक परिणाम स्पष्ट केले. संविधानाने दिलेल्या हक्कांच्या संरक्षणासाठी समाजाने एकजुटीने उभे राहण्याची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. वक्त्यांनी आरक्षणाच्या उपवर्गीकरणाविरोधातील लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला. १० ऑगस्टच्या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात १० ऑगस्ट २०२६ रोजी रावेर तहसील कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या मोर्चात निरूळ पाडळे व परिसरातील नागरिकांनी, युवकांनी आणि समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.

# रावेरमध्ये अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात



जन सम्राट टाईम्स

**रावेर । प्रतिनिधी :** रावेर येथील फुले-शाहू-आंबेडकर सार्वजनिक वाचनालयात लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (दि. १ ऑगस्ट) विशेष अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी त्यांना भावपूर्ण अभिवादन केले.कार्यक्रमात उपस्थित वक्त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनप्रवासासह त्यांच्या विपुल साहित्यसंपदेवर सविस्तर प्रकाश टाकला. आपल्या लेखनातून आणि लोककलेच्या माध्यमातून त्यांनी शोषित, वंचित, कष्टकरी आणि उपेक्षित समाजाच्या वेदना प्रभावीपणे मांडल्या तसेच सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा दिली, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या "जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मज भीमराव" या अजरामर ओळींचा उल्लेख करत त्यांच्या साहित्याने समाजात समता, न्याय आणि परिवर्तनाची ज्योत प्रज्वलित केल्याचे सांगण्यात आले. अन्यायाविरुद्ध संघर्षाची प्रेरणा देणारे त्यांचे विचार आजही तितकेच प्रेरणादायी असल्याचे वक्त्यांनी नमूद केले.या कार्यक्रमाला वाचनालयाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, साहित्यप्रेमी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# स्वराज्य' आणि ' शाहिराची वाणी'चा जागर

## अण्णा भाऊ साठे जयंती उत्साहात साजरी



जन सम्राट टाईम्स

**प्रतिनिधी :** न्यू इंग्लिश स्कूल प्राथमिक विद्यामंदिरात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करून कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. महापुरुषांच्या विचारांचा वारसा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक प्रविण महाजन सर होते.
यावेळी मंगला पिंगळे, वंदना चौधरी आणि वैशाली पाचपांडे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त शाळेत वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळकांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान, राष्ट्रनिर्मितीतील कार्य आणि त्यांच्या विचारांचा प्रभाव यावर प्रभावी भाषणे सादर केली. तसेच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या साहित्य, सामाजिक कार्य आणि परिवर्तनवादी विचारांना अभिवादन करण्यात आले. यावेळी वंदना चौधरी यांनी लोकमान्य टिळक यांच्या कार्याचा सविस्तर आढावा घेतला, तर वैशाली पाचपांडे यांनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्य, सामाजिक बांधिलकी आणि देशकार्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. स्पर्धेच्या लहान गटात इयत्ता पहिलीतील पाटील उपासना किरण आणि इयत्ता दुसरीतील बार्हे तन्वी राकेश यांनी प्रथम क्रमांक पटकावला.
मोठ्या गटात इयत्ता तिसरीतील चौधरी ईशा विक्रम तसेच इयत्ता चौथीतील घोडकर हर्षिता सचिन आणि चव्हाण गितेश आनंदा यांनी प्रथम क्रमांक मिळवून विशेष कौतुकास पात्र ठरले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वंदना चौधरी, पुजा पाटील, आशा इसाने आणि जयश्री चौधरी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत महापुरुषांचे विचार जीवनात अंगीकारण्याचे आवाहन केले.

# आडगाव दारूबंदी प्रकरण तापले

## पोलिस पाटलांचे स्पष्टीकरण, महिनाभर कारवाईचा पत्ता नाही

जन सम्राट टाईम्स



**यावल| प्रतिनिधी:** यावल तालुक्यातील आडगाव येथील वाढत्या अवैध दारूविक्रीच्या प्रश्नावर आता नवे वळण आले असून, ग्रामस्थांच्या तक्रारींकडे आपण दुर्लक्ष केल्याच्या चर्चांना पोलिस पाटील धर्मराज रामदास बाविस्कर यांनी स्पष्ट शब्दांत उत्तर दिले आहे. ग्रामस्थांनी दिलेले निवेदन अवघ्या दोन दिवसांतच यावल पोलिस ठाण्याकडे पाठविण्यात आले असून, आपल्या अधिकारातील सर्व प्रशासकीय प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. मात्र, त्यानंतरही पोलिस प्रशासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. आडगावमध्ये गेल्या काही महिन्यांपासून अवैध दारूविक्री वाढल्याने गावातील सामाजिक वातावरण बिघडत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. दारूच्या व्यसनामुळे अनेक कुटुंबे आर्थिक संकटात सापडली असून, कौटुंबिक वाद, हिंसाचार आणि तरुण पिढीचे वाढते व्यसन यामुळे गावात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. महिला व मुलींना सार्वजनिक ठिकाणी वावरताना असुरक्षित वाटत असल्याची भावना देखील ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. 'या पार्श्वभूमीवर २१ जून २०२६ रोजी ग्रामस्थ, महिला भगिनी आणि ग्रामपंचायतीच्या वतीने अवैध दारूविक्रीवर तातडीने कारवाई करून गाव दारूमुक्त करण्याची मागणी करणारे लेखी निवेदन पोलिस पाटील धर्मराज बाविस्कर यांच्याकडे देण्यात आले होते. याबाबत माहिती देताना पोलिस पाटील धर्मराज बाविस्कर म्हणाले, "ग्रामस्थांकडून अर्ज मिळाल्यानंतर केवळ दोन दिवसांत, म्हणजेच २३ जून २०२६ रोजी मी तो यावल पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांच्याकडे पुढील कायदेशीर कारवाईसाठी पाठविला. माझ्या अधिकारातील सर्व कामकाज वेळेत पूर्ण झाले असून, पुढील कारवाईची जबाबदारी पोलिस प्रशासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाची आहे." त्यांनी पाठविलेल्या पत्रात गावात सुरू असलेल्या कथित अवैध दारूविक्रीची खातरजमा करून भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची विनंतीही करण्यात आली होती. मात्र, निवेदन सादर होऊन महिन्याहून अधिक कालावधी उलटूनही संबंधित विभागांकडून कोणतीही मोठी कारवाई किंवा धाड टाकण्यात आलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे गावात अवैध दारूविक्री पूर्ववत सुरू असून, संबंधितांमध्ये कारवाईची भीती उरलेली नसल्याची प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे ग्रामस्थ, युवक आणि महिला वर्गामध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. अवैध दारूविक्री तातडीने बंद करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. दरम्यान, लवकरच ठोस कारवाई न झाल्यास जिल्हा पोलिस अधीक्षक आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे थेट तक्रार करण्यात येईल. तसेच यावल पोलिस ठाण्यासमोर मोर्चा, उपोषण आणि तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही आडगावच्या ग्रामस्थांनी दिला आहे.

# टिटवाळ्यात श्री स्वामी समर्थ गुरुपौर्णिमा उत्सव भक्तिभावात संपन्न; पालखी सोहळा!


## भजन व महाप्रसादाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

जन सम्राट टाईम्स

**टिटवाळा| प्रतिनिधी:** श्री अक्कलकोट स्वामी समर्थ प्रतिष्ठान, टिटवाळा यांच्या वतीने बुधवार, दि. २९ जुलै २०२६ रोजी श्री स्वामी समर्थ गुरुपौर्णिमा उत्सवाचे ३३ वे वर्ष अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरे करण्यात आले. दिवसभर धार्मिक विधी, भजन, पालखी सोहळा, महाआरती आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. पंचक्रोशीतील हजारो स्वामीभक्तांनी उत्सवात सहभागी होत श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. सकाळी श्री स्वामी समर्थांच्या मूर्तीवर रुद्राभिषेक, महापूजा आणि सहस्रनामावलीसह तुळशीपत्र अर्पण करण्यात आले. त्यानंतर आरती व जयघोषाने परिसर भक्तिमय झाला. दुपारी महाप्रसादाचे नियोजनबद्ध पद्धतीने पाकिटांद्वारे वितरण करण्यात आले. मठात जागा अपुरी असल्याने केलेल्या या व्यवस्थेमुळे कोणतीही गैरसोय न होता सर्व भाविकांना महाप्रसादाचा लाभ मिळाला. सायंकाळी महिला मंडळाच्या वतीने सौ. दिपाली येवले आणि सौ. नयना पिंपूटकर यांच्या नेतृत्वाखाली स्तोत्र-स्तवन पठणाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर श्रीमती शरयू तुपे व सौ. सुवर्णा घारे यांच्या वृंदावनी भजनी मंडळाने सादर केलेल्या भजनांनी वातावरण भक्तिरसात रंगून गेले. यंदाच्या गुरुपौर्णिमा सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरला तो श्री स्वामी समर्थ पादुका पालखी सोहळा. पालखीच्या प्रत्येक फेरीसाठी स्वतंत्र गट तयार करण्यात आल्याने सर्व भाविकांना सहभागी होण्याची संधी मिळाली. विशेष म्हणजे १० महिलांच्या पालखी पथकाने नऊवारी साडी परिधान करून टाळ-मृदुंगाच्या गजरात, ध्वज आणि पताका हाती घेत पालखीची शोभा अधिकच वाढवली. या देखण्या सोहळ्याने उपस्थितांची मने जिंकली. पालखी सोहळ्यानंतर महाआरती करण्यात आली. त्यानंतर रात्री उशिरापर्यंत महाप्रसादाचे वितरण सुरू होते. संपूर्ण उत्सवाचे नियोजन मठाच्या व्यवस्थापिका श्रीमती सुप्रियाताई कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पडले. विविध समित्यांमधील सेवेकरी, स्वयंसेवक आणि तरुण स्वामीभक्तांनी स्वच्छता, व्यवस्था आणि सेवा कार्यात मोलाचे योगदान दिले. उत्सवातील सर्व धार्मिक विधी श्री सुहास पाठक गुरुजी यांच्या हस्ते विधिवत पार पडले. तसेच श्री गोस्वामी गुरुजी आणि श्री देशपांडे गुरुजी यांचेही सहकार्य लाभले. महाप्रसादाची उत्कृष्ट व्यवस्था श्री दुखंडे यांनी तर मंडप, सजावट व ध्वनी व्यवस्थेची जबाबदारी श्री नरेश डेकोरेटर्स यांनी यशस्वीरीत्या सांभाळली. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थापिका श्रीमती सुप्रियाताई कदम यांनी सर्व स्वामीभक्त, सेवेकरी, देणगीदार, अन्नदाते आणि सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानत पुढील काळातही अशीच सेवा अखंड सुरू राहावी, अशी श्री स्वामी समर्थांच्या चरणी प्रार्थना केली. गुरुपौर्णिमा महोत्सवाने टिटवाळ्यात भक्ती, सेवा आणि सामाजिक ऐक्याचा प्रेरणादायी संदेश दिला.

# अंजनी नदीतील थरारक बचाव मोहीम यशस्वी

जन सम्राट टाईम्स



**धरणगाव। प्रतिनिधी:** धरणगाव तालुक्यातील चावलखेडा येथे अंजनी नदीला आलेल्या पुरामुळे झाडावर अडकलेल्या एका व्यक्तीची प्रशासनाने धाडसी आणि यशस्वी बचाव मोहीम राबवत सुखरूप सुटका केली. या वेळी प्रशासन, पोलीस आणि बचाव पथकाने दाखविलेल्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला. मुसळधार पावसामुळे अंजनी नदीच्या पाणीपातळीत अचानक वाढ झाल्याने श्री. सुरेश भील हे पुराच्या पाण्यात अडकून झाडावर आश्रय घेण्यास बाध्य झाले होते. घटनेची माहिती मिळताच नायब तहसीलदार, पोलीस निरीक्षक आणि संबंधित आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सातत्याने समन्वय साधत बचाव कार्याचे नियोजन करण्यात आले. त्यानंतर बचाव पथकाने अत्यंत धाडसाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने नदीत उतरून श्री. सुरेश भील यांची सुरक्षित सुटका केली. बचाव मोहीम यशस्वी झाल्यानंतर प्रशासन, बचाव पथक आणि उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले. दरम्यान, जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी नदी, नाले आणि पूरग्रस्त भागाजवळ जाणे टाळावे, तसेच प्रशासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करून सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# शिक्षक भरतीला खो का?!

## शिक्षक भरती कृती समितीचा घणाघात

जन सम्राट टाईम्स

**नागपूर | प्रतिनिधी :** राज्यात निवडणुका वेळेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडतात, मात्र क्रीडा शिक्षक आणि कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांची भरती वर्षानुवर्षे रखडत असल्याचा आरोप करत कृती समितीचे राज्याध्यक्ष एस.एम. नागपुरे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. पवित्र पोर्टलद्वारे सुरू असलेल्या शिक्षक भरतीच्या पहिल्या टप्प्यात क्रीडा शिक्षक आणि कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना डावलण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला असून, हा सुशिक्षित बेरोजगारांवरील अन्याय असल्याचे म्हटले आहे.
नागपुरे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, निवडणुकांची प्रक्रिया वेळेत पूर्ण होते, परंतु राज्याचे भवितव्य घडविणाऱ्या शिक्षकांच्या भरतीबाबत सरकारकडून सातत्याने विलंब केला जात आहे. त्यामुळे हजारो पात्र उमेदवारांना मानसिक, आर्थिक आणि सामाजिक त्रास सहन करावा लागत आहे. यावेळी त्यांनी पालकांनाही थेट आवाहन करत म्हटले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये प्रामुख्याने गोरगरीब, शेतकरी आणि कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यामुळे या शाळांमध्ये शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरली जाणे आवश्यक आहे.
शिक्षकांची कमतरता कायम राहिल्यास विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होईल, असा इशाराही त्यांनी दिला.
राजकीय नेत्यांना प्रश्न विचारण्याची वेळ आता आली असून, "निवडणुका वेळेत होतात तर शिक्षक भरती वेळेत का होत नाही?" हा प्रश्न प्रत्येक पालकाने आपल्या लोकप्रतिनिधींना विचारावा, असे आवाहन नागपुरे यांनी केले. क्रीडा शिक्षकांच्या प्रश्नावर बोलताना त्यांनी 'खेळो इंडिया' आणि 'फिट इंडिया'सारख्या योजनांचा उल्लेख करत, एका बाजूला क्रीडेला प्रोत्साहन देण्याची भाषा केली जाते, तर दुसरीकडे बी.पी.एड. आणि एम.पी.एड. पात्रताधारक उमेदवारांना भरती प्रक्रियेत संधी दिली जात नसल्याचा आरोप केला. शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (TAIT) उत्तीर्ण होऊनही हजारो क्रीडा शिक्षक नियुक्तीच्या प्रतीक्षेत असल्याचे त्यांनी नमूद केले.
कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या भरतीबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली. ११ वी आणि १२ वीच्या वर्गांसाठी आवश्यक पात्रता असलेल्या उमेदवारांनाही पहिल्या टप्प्यातील भरती प्रक्रियेत स्थान मिळाले नसल्याचा दावा त्यांनी केला. सरकारकडून "अभ्यास सुरू आहे", "लवकर निर्णय होईल" अशा स्वरूपाची आश्वासने वारंवार दिली जात आहेत; मात्र प्रत्यक्षात भरतीबाबत कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने उमेदवारांमध्ये प्रचंड नाराजी असल्याचे नागपुरे म्हणाले.

# लाडकुबाई प्राथमिक विद्यामंदिरात टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती

## विद्यार्थ्यांच्या मराठी-इंग्रजीतील प्रभावी भाषणांनी जिंकली उपस्थितांची मने

जन सम्राट टाईम्स



**भडगाव| प्रतिनिधी :** लाडकुबाई प्राथमिक विद्यामंदिर, भडगाव येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रप्रेम, सामाजिक जाणीव, वक्तृत्वकला आणि थोर व्यक्तींच्या विचारांचा वारसा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक कमलेश शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन किरण पाटील व ज्ञानेश्वर गांगुर्डे यांनी केले. यावेळी इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर मराठी तसेच इंग्रजी भाषेत प्रभावी भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने मांडलेल्या विचारांना उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. विशेषतः इंग्रजी भाषेतील काही विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमादरम्यान लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रभक्ती, स्वराज्याच्या विचारांची तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, सामाजिक कार्य आणि परिवर्तनवादी विचारांची विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ओळख करून देण्यात आली. महान व्यक्तींच्या कार्यातून विद्यार्थ्यांनी आदर्श घेऊन समाजाप्रती जबाबदारीची भावना जोपासावी, असा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमाचे छायाचित्रण सुयोग पाटील व हर्षल पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संगीता शेलार, सुनीता देवरे, अनिता सैंदाणे, अनंत हिरे, ज्ञानेश्वर गांगुर्डे, सुयोग पाटील, हरिचंद्र पाटील आणि किरण पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, शिक्षकांचे नियोजन आणि प्रेरणादायी वातावरणामुळे हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला. उपस्थितांनी महान व्यक्तींच्या विचारांचा वारसा जपत विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, देशप्रेम आणि वक्तृत्व कौशल्य विकसित करण्याच्या शाळेच्या उपक्रमाचे कौतुक केले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# भरत जाधववर 'मोक्का' लावण्याची मागणी; धुळ्यात आदिवासी बांधव आक्रमक

## जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन; १५ ऑगस्टला आत्मदहनाचा इशारा

जन सम्राट टाईम्स

**धुळे** | धुळे शहरातील अन्वर नाला परिसरातील आदिवासी बांधवांनी भरत जाधव आणि त्याच्या साथीदारांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्याची मागणी करत जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले. यावेळी आंदोलकांनी पोस्टर झळकावत तीव्र निषेध नोंदवला. निवेदनात जुन्या वादाच्या पार्श्वभूमीवर भरत जाधव व त्याच्या साथीदारांकडून महिलांसह कुटुंबीयांना वारंवार मारहाण, धमक्या आणि त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.



या प्रकारामुळे परिसरातील आदिवासी कुटुंबांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आपल्या जीविताला धोका असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. तक्रारीनंतरही अपेक्षित कारवाई होत नसल्याचा आरोप करत, संबंधितांकडून पोलिसांसमोरच जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा गंभीर आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. तसेच समाजमाध्यमांवरून दिल्या जाणाऱ्या धमक्यांची दखल घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. यावेळी पोलिसांकडून न्याय मिळत नसल्याचा आरोप करत, भरत जाधव आणि त्याच्या साथीदारांवर तातडीने कठोर कारवाई न झाल्यास १५ ऑगस्ट रोजी सामूहिक आत्मदहन आंदोलन छेडण्याचा इशारा आदिवासी बांधवांनी दिला. या आंदोलनात मोहन मोरे, किशोर मोरे, विजय गायकवाड, किशोर गायकवाड, पवन वाघ, किरण भगरे, संगीता गायकवाड, पूजा गायकवाड, रत्ना मोरे, छायाबाई अहिरे, सरला गायकवाड, सुनिता मोरे, शकुंतला मोरे यांच्यासह आदिवासी समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी

यावेळी आंदोलकांनी पोस्टर झळकावत तीव्र निषेध नोंदवला. निवेदनात जुन्या वादाच्या पार्श्वभूमीवर भरत जाधव व त्याच्या साथीदारांकडून महिलांसह कुटुंबीयांना वारंवार मारहाण, धमक्या आणि त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे परिसरातील आदिवासी कुटुंबांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आपल्या जीविताला धोका असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. तक्रारीनंतरही अपेक्षित कारवाई होत नसल्याचा आरोप करत, संबंधितांकडून पोलिसांसमोरच जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा गंभीर आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. तसेच समाजमाध्यमांवरून दिल्या जाणाऱ्या धमक्यांची दखल घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

# जळगाव खुर्द येथे पडलेले ११ केव्हीचे पोल युद्धपातळीवर उभे

## महावितरणची प्रशंसनीय कामगिरी

जन सम्राट टाईम्स

**जळगाव खुर्द | प्रतिनिधी:** परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे जळगाव खुर्द येथे ११ केव्ही वीजवाहिनीचे पोल कोसळल्याने जळगाव खुर्द व परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता. मात्र, महावितरणच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत युद्धपातळीवर दुरुस्तीची कामे पूर्ण करत अल्पावधीतच वीजपुरवठा सुरळीत केला. पोल कोसळल्याची माहिती मिळताच नशिराबाद ग्रामीण कक्षाचे कनिष्ठ अभियंता जयेंद्र सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली नरेंद्र परदेशी, सचिन सोनवणे, साक्षी पाटील, दीक्षा बोरोले आणि प्रभाकर महाजन यांनी त्वरित घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचा आढावा घेतला. प्रतिकूल हवामान आणि आव्हानात्मक परिस्थितीतही महावितरणच्या पथकाने युद्धपातळीवर काम करत पडलेले



११ केव्हीचे पोल पुन्हा उभे केले. त्यानंतर वीजवाहिनीची आवश्यक दुरुस्ती करून वीजपुरवठा सुरक्षितपणे पूर्ववत करण्यात आला. महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या तत्परता, समन्वय आणि कार्यतत्परतेमुळे परिसरातील नागरिकांना दीर्घकाळ अंधाराचा सामना करावा लागला नाही. या प्रशंसनीय कामगिरीबद्दल जळगाव खुर्द व खिर्डी येथील ग्रामस्थांनी महावितरणच्या संपूर्ण पथकाचे मनःपूर्वक आभार मानत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# पुरात अडकलेल्या चिमुकल्याची थरारक सुटका

## अग्निशमन दल विभागाच्या मोहिमेला यश

जन सम्राट टाईम्स

पारोळा । प्रतिनिधी । अमळनेर शहरातील भालेराव नगर येथील गुरुकृपा कॉलनीत नाल्याला आलेल्या पुरामुळे एका घरात अडकलेल्या अवघ्या एक महिन्याच्या बाळासह संपूर्ण कुटुंबाची अग्निशमन दल आणि आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी जीव धोक्यात घालून सुखरूप सुटका केली. या धाडसी बचाव मोहिमेचे शहरभर कौतुक होत आहे. मुसळधार पावसामुळे गुरुकृपा कॉलनी परिसरातील नाल्याला अचानक पूर आला. पाण्याचा प्रवाह इतका वेगवान होता की, अनेक घरांमध्ये छातीपर्यंत पाणी साचले. एका घरात एक महिन्याचे बाळ, त्याची आई, तीन लहान मुले, महिला आणि कुटुंबातील इतर सदस्य अडकले होते. घरात पाणी शिरल्याने त्यांनी पलंग व उंच जागेवर उभे राहून जीव वाचविण्याचा प्रयत्न सुरू ठेवला. घटनेची माहिती मिळताच नगरपालिकेचे मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी तातडीने बचाव पथक रवाना केले. आरोग्य निरीक्षक किरण कंडारे, गोल्डी बिऱ्हाडे तसेच अग्निशमन दलाचे फारुख शेख, दिनेश बिऱ्हाडे, भिका संदानशीव आणि पवन बिऱ्हाडे घटनास्थळी दाखल झाले. मात्र, पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान असल्याने सुरुवातीला घरापर्यंत पोहोचणे शक्य होत नव्हते. त्यानंतर दोर आणि लाइफ जॅकेटची व्यवस्था करून मानवी साखळी तयार करण्यात आली. जवळपास दोन तासांच्या अथक



प्रयत्नांनंतर बचाव पथकाने अडकलेल्या कुटुंबापर्यंत मजल मारली. विशेष म्हणजे, अवघ्या एक महिन्याच्या चिमुकल्याला सुरक्षित ठेवण्यासाठी त्याला प्लास्टिकच्या टबमध्ये अलगद ठेवून पाण्यातून बाहेर काढण्यात आले. अवघ्या एक महिन्याच्या बाळासह संपूर्ण कुटुंबाची अग्निशमन दल आणि आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी जीव धोक्यात घालून सुखरूप सुटका केली. या धाडसी बचाव मोहिमेचे शहरभर कौतुक होत आहे. मुसळधार पावसामुळे गुरुकृपा कॉलनी परिसरातील नाल्याला अचानक पूर आला. त्यानंतर आईसह तीन महिला, तीन लहान मुले आणि कुटुंबातील इतर सदस्यांना जवळील इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर सुरक्षितस्थळी हलविण्यात आले. या धाडसी आणि वेळेवर पार पडलेल्या बचाव मोहिमेमुळे मोठी दुर्घटना टळली. जीवाची पर्वा न करता कार्य करणाऱ्या अग्निशमन दल आणि आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांचे अमळनेर शहरासह परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत असून त्यांच्या कार्याला सलाम केला जात आहे.

# करणी सेनेच्या कार्यकारी अध्यक्षपदी राजपूत

## खान्देश प्रवक्तापदी भास्कर पाटील यांची नियुक्ती

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी:** राजपूत समाजाच्या संघटन, सक्षमीकरण आणि समाजहितासाठी कार्यरत असलेल्या राष्ट्रीय राजपूत करणी सेना संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदी दामोदर राजपूत यांची नियुक्ती करण्यात आली असून, भालोद येथील शिक्षक भास्कर नामदेव पाटील यांची खान्देश प्रवक्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्त्यांमुळे राजपूत समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून दोघांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ही नियुक्ती सनातन रत्न परमपूज्य महामंडलेश्वर जनार्दनहरीजी महाराज यांच्या आशीर्वादाने तसेच राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षा ॲड. शीला भाभीसा सुखदेवसिंहजी गोगामेडी, राष्ट्रीय कार्यकारी उपाध्यक्ष तथा राष्ट्रीय संघटन महामंत्री योगेंद्रसिंहजी कट्यार, राष्ट्रीय उपाध्यक्ष अभयराजसिंहजी गोगामेडी, आनंदसिंहजी ठोके आणि महामंत्री सूरजसिंह ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रवीणसिंहजी पाटील (राजपूत) यांनी या



नियुक्त्यांची घोषणा केली. दामोदर राजपूत यांनी समाजकार्यात केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांना प्रदेश उपाध्यक्ष पदावरून कार्यकारी अध्यक्षपदी पदोन्नती देण्यात आली आहे.

तसेच भास्कर नामदेव पाटील यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि संघटनात्मक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांच्यावर खान्देश प्रवक्त्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली. नियुक्तीनंतर मनोगत व्यक्त करताना दामोदर राजपूत आणि भास्कर (बी. एन.) पाटील यांनी राजपूत समाजाचे संघटन अधिक मजबूत करणे, समाजाच्या विविध प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडणे आणि समाजहितासाठी निःस्वार्थपणे कार्य करणे हेच आपले प्रमुख ध्येय राहील, असा निर्धार व्यक्त केला. तसेच प्रदेशाध्यक्ष प्रवीणसिंहजी पाटील यांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहू, असे त्यांनी सांगितले. यावेळी करणी सेनेचे सहप्रवक्ते राजेंद्रसिंह पाटील, प्रदेश सचिव आनंदा पाटील, जिल्हाध्यक्ष विठ्ठल मोरे, जिल्हाध्यक्ष संदीप राणा, महिला जिल्हाध्यक्ष सारिका पाटील, जिल्हा उपाध्यक्ष दिवाणसिंग राजपूत, शहराध्यक्ष गोकुळ राजपूत, जिल्हा सचिव पंकज चौधरी, जिल्हा उपाध्यक्ष मीना राजपूत, कविता राजपूत, जयश्री राजपूत, प्रतीक्षा पाटील, लता पाटील यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी दोन्ही नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून संघटना अधिक सक्षम करण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचा विश्वास व्यक्त केला.

# 'फकिरा' संघर्ष, स्वाभिमान आणि आत्मबळाची जिवंत शाळा

## भालोद महाविद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ। (प्रतिनिधी):** "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा' ही केवळ कादंबरी नसून संघर्ष, स्वाभिमान आणि आत्मबळाची जिवंत शाळा आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने फकिरा ही कादंबरी आवर्जून वाचावी. ही साहित्यकृती जीवनाचा खरा अर्थ, स्वाभिमानाचे महत्त्व आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देते. फकिरा मनामध्ये आत्मविश्वास आणि आत्मबळ जागवणारी साहित्यकृती आहे," असे प्रतिपादन मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. जतिनकुमार मेढे यांनी केले. सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.किशोर कोल्हे होते अध्यक्षीय भाषणात



प्राचार्य डॉ. किशोर कोल्हे यांनी अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या विचारांचा विद्यार्थ्यांनी सखोल अभ्यास करण्याचे आवाहन केले. "अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य विद्यार्थ्यांना संघर्षातून उभे राहण्याची प्रेरणा देते, तर लोकमान्य टिळकांचे राष्ट्रप्रेम, नेतृत्वगुण आणि कणखर व्यक्तिमत्त्व प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायी आहे. या दोन्ही महापुरुषांचे विचार आचरणात आणल्यास जीवन अधिक मूल्याधिष्ठित आणि यशस्वी होईल," असे त्यांनी सांगितले. राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुनील नेवे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच बहिणाबाई अभ्यासिकेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अतिकेश माळी, धीरज भालेराव, मुकेश भालेराव, सचिन पाटील, मोहित नेहते, जीवन भालेराव, विजय भालेराव, रूपम कोळी, कुणाल कोळी, अजय भालेराव, अभय सपकाळ, अजय पाटील, करिश्मा कोळी, पल्लवी कोळी, प्रियंका कोळी आणि आशुतोष भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती.

# मा. भवरलालभाऊ जैन सार्वजनिक वाचनालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात!

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव । प्रतिनिधी:** धरणगाव येथील मा. भवरलालभाऊ जैन सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय यांच्या वतीने शनिवार, १ ऑगस्ट २०२६ रोजी लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात नरेंद्रभाऊ



नेहते यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक, सामाजिक आणि परिवर्तनवादी कार्याला अभिवादन करत त्यांच्या विचारांचा जागर केला. कार्यक्रमास वाचनालयाचे सचिव योगेशभाऊ पाटील, माजी नगरसेवक नंदकिशोर पाटील, आदित्य योगेश पाटील, रघुनंदन वाघ, संजय बाविस्कर, जंगलू चव्हाण, पंडित मराठे, हरिसिंग जनकवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त अभिवादन

## रॅलीतून सामाजिक एकतेचा संदेश



जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त धुळे शहरातील फाशीफुल चौक येथे त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. यावेळी बहुजन समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला मानवंदना अर्पण केली. कार्यक्रमादरम्यान "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा विजय असो", "छत्रपती शिवाजी महाराज की जय", "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो" तसेच "भगवान वीर एकलव्य की जय" अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. उपस्थितांनी सामाजिक समता, बंधुता आणि परिवर्तनाच्या विचारांना उजाळा दिला.यानंतर तरुणांच्या सहभागातून भव्य मोटरसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. फाशीफुल चौकातून सुरू झालेली ही रॅली बसस्थानक मार्गे आंबेडकर पुतळा, जेल रोड, आग्रा रोड परिसरातून मार्गक्रमण करत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून पुन्हा फाशीफुल चौकात येऊन संपन्न झाली. रॅलीदरम्यान विविध महापुरुषांच्या स्मारकांना अभिवादन करून सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि संविधानिक मूल्यांचा संदेश देण्यात आला. शिस्तबद्ध पद्धतीने पार पडलेल्या या उपक्रमाचे नागरिकांनीही स्वागत केले. यावेळी ॲड. संतोष जाधव, वाल्मीक जाधव, कपिल चांदणे, शेरा पठाडे, देवा कढरे, प्रशांत थोरात, किशोर मोरे, किशोर बोरसे, राजू चव्हाण, संदीप जाधव, ॲड. विशाल साळवे, ॲड. शुभम मतकर, ॲड. पवन सूर्यवंशी, ॲड. निलेश सोनवणे यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रत्नापिंप्रीसह परिसरात अतिवृष्टीचा तडाखा; पिकांचे मोठे नुकसान

## गोपी नदीला पूर, घरांमध्ये पाणी; कापूस, मका, तूर, ज्वारीसह अनेक पिके बाधित

जन सम्राट टाईम्स

पारोळा । प्रतिनिधी । पारोळा तालुक्यातील रत्नापिंप्रीसह दबापिंप्री, होळपिंप्री, नेरपाट, चिखलोद, बोदर्डे, भोकरबारी, भिलाली आणि कंकराज परिसरात झालेल्या मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. रात्रभर आणि दिवसभर सुरू असलेल्या संततधार पावसामुळे अनेक शेतांमधून नाल्याचे पाणी वाहून गेल्याने उभी पिके पाण्याखाली गेली असून अनेक ठिकाणी पिके वाहून गेल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे अतिवृष्टीमुळे गोपी नदीला पूर आला असून नदीकाठच्या घरांमध्ये पाणी शिरल्याने घरगुती साहित्याचे



नुकसान झाले आहे. तसेच अनेक जुनी व जीर्ण घरे कोसळल्याने नागरिकांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

या पावसाचा सर्वाधिक फटका खरीप हंगामातील कापूस, मका, तूर, ज्वारी, बाजरी, उडीद आणि मूग या पिकांना बसला आहे. अनेक शेतांमध्ये अजूनही पाणी साचले असून पिकांच्या वाढीवर त्याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांनी सुरुवातीला समाधान व्यक्त केले होते. मात्र, पहाटेपासून झालेल्या मुसळधार पावसाने परिस्थिती बदलली आणि मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. दरम्यान, सततच्या पावसामुळे अनेक रस्त्यांवरून पाणी वाहिल्याने रस्त्यांचीही दुरवस्था झाली असून वाहतुकीवर परिणाम झाला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी प्रशासनाने तातडीने पंचनामे करून शासनाकडून आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी केली आहे. तसेच अतिवृष्टीमुळे झालेल्या शेती व घरांच्या नुकसानीचे त्वरित सर्वेक्षण करून मदत देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### उडीद आणि मूग या पिकांना बसला फटका

अनेक जुनी व जीर्ण घरे कोसळल्याने नागरिकांचे आर्थिक नुकसान झाले आहे. या पावसाचा सर्वाधिक फटका खरीप हंगामातील कापूस, मका, तूर, ज्वारी, बाजरी, उडीद आणि मूग या पिकांना बसला आहे. अनेक शेतांमध्ये अजूनही पाणी साचले असून पिकांच्या वाढीवर त्याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांनी सुरुवातीला समाधान व्यक्त केले होते. मात्र, पहाटेपासून झालेल्या मुसळधार पावसाने परिस्थिती बदलली आणि मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

# जळगावात पोलिसांची मोठी कारवाई; 3.58 लाखांचा 62 ग्रॅम 'एमडी' ड्रग्ज जप्त

## एमआयडीसी पोलिसांची संयुक्त धडक; दोघांविरुद्ध एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा

जन सम्राट टाईम्स



**जळगाव |** जळगाव जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधात पोलिसांनी मोठी कारवाई करत ६२.०७ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) ड्रग्ज जप्त केले आहे. स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) आणि एमआयडीसी पोलिसांच्या संयुक्त कारवाईत ३ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायदा व भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या 'नशामुक्त भारत' अभियानांतर्गत जिल्ह्यात सुरू असलेल्या विशेष मोहिमेदरम्यान ही कारवाई करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी राहुल गायकवाड यांना गुप्त माहिती मिळाली होती की, एमआयडीसी परिसरातील वखार महामंडळ (सेक्टर A-14) समोरील रस्त्यावर एक व्यक्ती अंमली पदार्थांची वाहतूक करणार आहे. या माहितीच्या आधारे ३१ जुलै रोजी रात्री १०.४० वाजता पोलिसांनी सापळा रचून इम्रान खान हयात खान (वय ३६, रा. आव्हाणे, ह.मु. फातेमा नगर, जळगाव) याला ताब्यात घेतले. त्याच्या झडतीत मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्ज आढळून आले. प्राथमिक तपासात जप्त करण्यात आलेल्या एमडी ड्रग्जचा पुरवठा रफीक उर्फ गोल्डन (रा. मालेगाव, जि. नाशिक) याने केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार इम्रान खान आणि रफीक उर्फ गोल्डन या दोन्ही आरोपींविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दीपक जगदाळे करीत आहेत. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, "जिल्ह्यातील तरुणांना अंमली पदार्थांच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी अशा कारवाया आणखी तीव्र केल्या जातील. अंमली पदार्थांची विक्री किंवा वाहतूक होत असल्याची माहिती असल्यास नागरिकांनी तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी किंवा डायल ११२ वर संपर्क साधावा.

### मालेगावच्या पुरवठादाराचा सहभाग उघड

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित, उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी राहुल गायकवाड, पोलीस निरीक्षक बबन आव्हाड, सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ, पोलीस उपनिरीक्षक दीपक जगदाळे, जितेंद्र वल्टे, अतुल वंजारी तसेच एलसीबी व एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## मुसळधार पावसाचा दुर्दैवी बळी!

### भिंतीचे दगड पडून शेतकऱ्याचा मृत्यू

जन सम्राट टाईम्स



**पारोळा | प्रतिनिधी:** पारोळा तालुक्यातील भोलाणे येथे मुसळधार पावसामुळे घडलेल्या दुर्दैवी घटनेत ६५ वर्षीय वृद्ध शेतकऱ्याचा मृत्यू झाला. घरात शिरणारे पावसाचे पाणी अडविण्याचा प्रयत्न करत असताना कच्च्या भिंतीचे दगड अंगावर कोसळल्याने गंभीर दुखापत होऊन प्रकाश अर्जुन करंजे (वय ६५) यांचा मृत्यू झाला. शुक्रवारी (दि. ३१) सकाळपासूनच परिसरात मुसळधार पाऊस सुरू होता. घराच्या पाठीमागील नाल्याला मोठ्या प्रमाणावर पूर आल्याने पाणी थेट करंजे यांच्या घरात शिरू लागले.

सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास घरात अधिक पाणी येऊ नये म्हणून ते घराजवळ अडकलेली घाण बाजूला करत होते. याचवेळी कच्च्या पायावरील भिंतीचे दगड अचानक कोसळून त्यांच्या अंगावर पडले.


दगडांचा जोरदार फटका बसल्याने त्यांचा तोल गेला आणि ते दगडांवर पडल्याने डोक्याला गंभीर दुखापत झाली.घटनेनंतर कुटुंबीयांनी व ग्रामस्थांनी त्यांना तातडीने पारोळा येथील कुटीर रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. या घटनेची माहिती कांतीलाल करंजे यांनी पारोळा पोलीस ठाण्यात दिली. त्यानुसार अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून हवालदार कैलास साळुंखे पुढील तपास करीत आहेत. मुसळधार पावसामुळे जिल्ह्यात विविध भागांत नुकसान होत असताना या दुर्दैवी घटनेमुळे भोलाणे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

## भडगाव तालुक्यात 'आकडे' टाकून वीज चोरीचा सुळसुळाट

### महावितरणच्या कर्मचाऱ्यांना धमक्या

जन सम्राट टाईम्स



**भडगाव | प्रतिनिधी :** भडगाव तालुक्यातील गिरड सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या काही गावांमध्ये विजेच्या खांबांवर 'आकडे' टाकून मोठ्या प्रमाणावर वीज चोरी होत असल्याचा आरोप समोर आला आहे. हा प्रकार केवळ बेकायदेशीरच नव्हे, तर जीवित आणि वित्तहानीचा गंभीर धोका निर्माण करणारा असल्याने महावितरण विभागासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. याप्रकरणी संबंधितांवर कठोर कारवाई करून वीज चोरीसाठी टाकण्यात आलेले आकडे तातडीने हटवावेत, अशी मागणी सुज्ञ नागरिकांकडून होत आहे. गिरड, मानकी, भट्टगाव, पिंपळगाव, भातखंडे तसेच परिसरातील काही गावांमध्ये विजेच्या खांबांवरून थेट तार जोडून अनेक घरांना बेकायदेशीर वीजपुरवठा केला जात असल्याचे सांगितले जात आहे. महावितरणचे अधिकारी आणि कर्मचारी वरिष्ठांच्या आदेशानुसार हे आकडे काढण्यासाठी गेले असता काही व्यक्तींकडून त्यांना विरोध करण्यात येत असल्याची माहिती आहे. महावितरण कर्मचाऱ्यांना दमदाटी करणे, मारहाणीची धमकी देणे, खोट्या तक्रारी करण्याची भाषा वापरणे, तसेच जातीवाचक शिवीगाळ केल्याचे खोटे आरोप करून गुन्हे दाखल करण्याची धमकी देण्यात येत असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे अनेक अधिकारी आणि कर्मचारी कारवाई करताना धास्तावल्याचे बोलले जात आहे.

वीज विभागाच्या माहितीनुसार, विजेच्या खांबांवर टाकलेले बेकायदेशीर आकडे कोणत्याही क्षणी शॉर्टसर्किट, विजेचा धक्का किंवा आग लागण्यास कारणीभूत ठरू शकतात. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा प्रकार अत्यंत धोकादायक असून वेळीच नियंत्रण न ठेवल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. रड, मानकी, भट्टगाव, पिंपळगाव, भातखंडे तसेच परिसरातील काही गावांमध्ये विजेच्या खांबांवरून थेट तार जोडून अनेक घरांना बेकायदेशीर वीजपुरवठा केला जात असल्याचे सांगितले जात आहे. ममहावितरणने नागरिकांना वीज चोरीला पाठबळ न देण्याचे आणि बेकायदेशीर जोडण्या काढण्यासाठी येणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. तसेच वीज चोरी रोखण्यासाठी आणि नियमबाह्य आकडे हटविण्यासाठी लवकरच विशेष कारवाई मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहितीही सूत्रांकडून मिळाली आहे. टीप: या वृत्तातील आरोप संबंधितांकडून करण्यात आलेल्या दाव्यांवर आधारित असून, संबंधित व्यक्तींची अधिकृत भूमिका अद्याप

## तरसोद–पाळधी महामार्गावरील गिरणा पुलाजवळ साईडपट्ट्यांना खोल भेगा!

### अपघाताचा धोका ; रस्त्याच्या कडेला खचण्यास सुरुवात

जन सम्राट टाईम्स



**जळगाव | प्रतिनिधी:** तरसोद–पाळधी महामार्गावरील गिरणा नदीच्या पुलाजवळ रस्त्याच्या साईडपट्ट्यांना मोठ्या व खोल भेगा पडल्याचे समोर आले असून, रस्त्याचा कडील भाग खचू लागल्याने गंभीर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. या धोकादायक परिस्थितीकडे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) आणि संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. पक्षीमित्र राजेंद्र गाडगीळ यांनी पक्षीनिरीक्षणासाठी भटकंतीदरम्यान ही बाब निदर्शनास आणली. गिरणा पुलाजवळील साईडपट्ट्यांमध्ये मोठ्या प्रमाणात तडे गेले असून काही ठिकाणी रस्त्याचा कडील भाग धसू लागल्याचे त्यांनी सांगितले. हा रस्ता अवघ्या दोन-तीन वर्षांपूर्वीच पूर्ण झाला असल्याने त्याच्या गुणवत्तेबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या महामार्गावरून दररोज हजारो लहान-मोठी वाहने, अवजड मालवाहू ट्रक आणि प्रवासी वाहने मोठ्या प्रमाणात धावत असतात. अशा परिस्थितीत साईडपट्टी अधिक खचल्यास वाहनचालकांचा ताबा सुटून गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

स्थानिक नागरिकांनी संबंधित विभागाने तात्काळ पाहणी करून धोकादायक भागाची दुरुस्ती करावी

आवश्यक ठिकाणी इशारा फलक व सुरक्षा बॅरिकेड्स उभारावेत आणि भविष्यात कोणतीही जीवितहानी होणार नाही, यासाठी त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. महामार्गावरील या धोकादायक स्थितीमुळे वाहनचालकांमध्येही चिंता व्यक्त केली जात असून, प्रशासनाने वेळेवर कारवाई केल्यास संभाव्य दुर्घटना टाळता येईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

पाळधी महामार्गावरील गिरणा नदीच्या पुलाजवळ रस्त्याच्या साईडपट्ट्यांना मोठ्या व खोल भेगा पडल्याचे समोर आले असून, रस्त्याचा कडील भाग खचू लागल्याने गंभीर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) आणि संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## अत्त दीप भव अभ्यासिकेतर्फे नालंदा बुद्ध विहारात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती



जन सम्राट टाईम्स

**चिंचोली | प्रतिनिधी :** चिंचोली येथील अत्त दीप भव अभ्यासिकेच्या वतीने नालंदा बुद्ध विहार येथे साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. यानंतर अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊंच्या संघर्षमय जीवनप्रवास, साहित्यिक कार्य आणि सामाजिक परिवर्तनातील योगदानावर मनोगते व्यक्त केली. त्यांच्या विचारांनी आजच्या तरुण पिढीला अन्यायाविरुद्ध लढण्याची आणि शिक्षणाच्या बळावर पुढे जाण्याची प्रेरणा मिळते, असे विद्यार्थ्यांनी सांगितले.महापुरुषांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न अभ्यासिकेचे संचालक अतुल साळुंके यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, "अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य आणि विचार विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहेत. अभ्यासिकेच्या माध्यमातून महापुरुषांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे हाच आमचा उद्देश आहे." ग्रामस्थांची उत्स्फूर्त उपस्थिती या कार्यक्रमाला गावातील नागरिक, विद्यार्थी आणि मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

यामध्ये सुनंदाताई पारधे, अपरान्त साळुंके, मुकेश साळुंखे, महिंद्र साळुंखे, कल्पेश साळुंखे, जय सपकाळ, अक्षय सपकाळे, मनोज नन्नवरे, गौतम साळुंखे, पारवेश पिंजारी, फिरोज तडवी, गुलाब साळुंके, आकाश भालेराव, राजू तडवी, अतुल सोनवणे आणि आदित्य मोरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अण्णाभाऊ साठे यांचे विचार प्रेरणादायी

अण्णाभाऊंच्या संघर्षमय जीवनप्रवास, सामाजिक परिवर्तनातील योगदानावर मनोगते व्यक्त केली. त्यांच्या विचारांनी आजच्या तरुण पिढीला अन्यायाविरुद्ध लढण्याची आणि शिक्षणाच्या बळावर पुढे जाण्याची प्रेरणा मिळते, असे विद्यार्थ्यांनी सांगितले.महापुरुषांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न अतुल साळुंके यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, "अण्णाभाऊ साठे यांचे विचार विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहेत.

## जळगावात ८० किलो गोमांस जप्त

जन सम्राट टाईम्स

जळगाव | प्रतिनिधी : जळगाव शहरातील एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी धडक कारवाई करत ८० किलो गोमांस जप्त केले असून चार जणांना ताब्यात घेतले आहे. ही कारवाई १ ऑगस्ट २०२६ रोजी गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत पुंडलिक धनके यांना जळगाव शहरातील पिझदि वाडा, जामा मशिदीसमोरील पत्र्याच्या शेडमध्ये काही व्यक्ती गोमांसाची विक्री करत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिल्यानंतर पोलिसांनी पंचांसमवेत छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी युसुफ खान इस्माईल खान, शफी शेख बाबुलाल कुरेशी), शेख मुख्तार शेख बिस्मिल्ला आणि शेख रईस शेख मुनाफ या चौघांना ताब्यात घेतले. या प्रकरणी पोलीस हवालदार अफजल रफियोद्दीन बागवान यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात सीसीटीएनएस गुन्हा क्रमांक ६३६/२०२६ नोंद करण्यात आला आहे.

## भारत विकास परिषद शाखेच्या नूतन कार्यकारिणीची घोषणा

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा । प्रतिनिधी:** समाजकार्यातून राष्ट्रनिर्माण' हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून कार्यरत असलेल्या भारत विकास परिषद, पाचोरा शाखेच्या वर्ष २०२६-२७ या कार्यकाळासाठी नूतन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. शाखेला नव्याने गतिमान करण्याच्या उद्देशाने रविवारी रात्री आयोजित करण्यात आलेल्या विशेष ऑनलाइन बैठकीत ही घोषणा करण्यात आली. बैठकीला भारत विकास परिषदेचे प्रांत सचिव राजेंद्र जाखडी (धुळे) यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली. नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे अध्यक्ष: डॉ. संजय जाधव उपाध्यक्ष: डॉ. राहुल झेरवाल सचिव: गोकुळ सोनार महिला सहभागिता समन्वयक: पूजा तांबोळी संस्कार समन्वयक: कमलेश सोनवणे बैठकीस प्रांत सचिव राजेंद्र जाखडी, डॉ. पंकज हरणे, सतीश जाधव यांच्यासह अन्य



मान्यवर उपस्थित होते. यावेळी आगामी वर्षातील विविध सामाजिक, शैक्षणिक व सेवाभिमुख उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पाचोरा शहरात भारत विकास परिषदेचे विचार व कार्य अधिक व्यापक स्तरावर पोहोचविण्यासाठी सदस्य नोंदणी अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच संस्कार, सेवा, संपर्क आणि पर्यावरण या चार प्रमुख गतिविधींवर आधारित विविध उपक्रम वर्षभर राबविण्यात येणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी पाचोरा शाखेला प्रांतातील आदर्श शाखा म्हणून विकसित करण्याचा संकल्प व्यक्त केला.

राष्ट्रप्रेमाची भावना दृढ करण्याच्या उद्देशाने राष्ट्रगीताने बैठकीची सांगता करण्यात आली.

## खान्देशच्या सुपुत्राचा गौरव; डॉ. पृथ्वीराज सैंदाणे यांना 'महा अॅक्युपंक्चर रत्न पुरस्कार

### छत्रपती संभाजीनगर येथे भव्य सोहळ्यात आरोग्यसेवेतील उल्लेखनीय योगदानाची दखल

जन सम्राट टाईम्स

**चोपडा | प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्याचे सुपुत्र आणि *'वामन अॅक्युपंक्चर अँड नॅचरोपॅथी सेंटर'*चे संचालक डॉ. पृथ्वीराज सैंदाणे यांना आरोग्य सेवा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'महा अॅक्युपंक्चर रत्न पुरस्कार २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार १९ जुलै २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित भव्य सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन (AIMA) आणि AGMA यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात अॅक्युपंक्चर व निसर्गोपचार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या उपचारकांचा गौरव करण्यात आला. आयुर्वेद, योग, सिद्धा, होमिओपॅथी, अॅक्युपंक्चर आणि निसर्गोपचार अशा विविध चिकित्सा पद्धतींचा प्रसार व जनजागृती करण्यासाठी कार्यरत असलेल्या या संस्थेने डॉ. सैंदाणे यांच्या सेवाकार्याची विशेष दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान केला. डॉ. पृथ्वीराज सैंदाणे यांनी जळगाव जिल्ह्यात हजारो रुग्णांवर अॅक्युपंक्चर व निसर्गोपचार पद्धतीने उपचार करून आरोग्यसेवा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या या सेवाभावी कार्याचा गौरव म्हणून त्यांना



हा राज्यस्तरीय सन्मान बहाल करण्यात आला. कार्यक्रमाला मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेते डॉ. सुयोग गोरहे (नाव उपलब्ध माहितीनुसार), राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष अॅड. नाझिर काझी, अॅड. दत्तात्रय जाधवर, अॅड. नागेश सोनुने यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी AIMA/AGMA चे चेअरमन डॉ. सतीश कराळे, व्हाईस चेअरमन डॉ. नितीनराजे पाटील, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबुराव कानडे, तसेच डॉ. अभिजित कवठकर, डॉ. प्रशांत सावंत, डॉ. दिशा चव्हाण, डॉ. स्मिता खारकर, डॉ. विनोद ढोबळे, डॉ. सारंग फुके, डॉ. श्रीधर मेश्राम, डॉ. राजेंद्र गोरे, डॉ. तुषार वाघुळदे, डॉ. विजय पाटील यांच्यासह अनेक वैद्यकीय तज्ज्ञ आणि पदाधिकारी उपस्थित होते. डॉ. पृथ्वीराज सैंदाणे यांच्या या राज्यस्तरीय सन्मानामुळे चोपडा तालुक्यासह संपूर्ण खान्देशाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्याचे सुपुत्र आणि *'वामन अॅक्युपंक्चर अँड नॅचरोपॅथी सेंटर'*चे संचालक डॉ. पृथ्वीराज सैंदाणे यांना आरोग्य सेवा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'महा अॅक्युपंक्चर रत्न पुरस्कार २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार १९ जुलै २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित भव्य सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन (AIMA) आणि AGMA यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात अॅक्युपंक्चर व निसर्गोपचार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या उपचारकांचा गौरव करण्यात आला. आयुर्वेद, योग, सिद्धा, होमिओपॅथी, अॅक्युपंक्चर आणि निसर्गोपचार अशा विविध चिकित्सा पद्धतींचा प्रसार व जनजागृती करण्यासाठी कार्यरत असलेल्या या संस्थेने डॉ. सैंदाणे यांच्या सेवाकार्याची विशेष दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान केला.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेला गती

जन सम्राट टाईम्स



**मुंबई| प्रतिनिधी :** राज्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा निर्णय घेत राज्य सरकारने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत पहिल्या टप्प्यात ७,००० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास मंजुरी दिली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय (GR) सहकार विभागाने जारी केला असून कर्जमुक्ती प्रक्रियेला वेग येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी या योजनेसाठी २०,५५२ कोटी रुपयांचा निधी पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आला होता. त्यापैकी पहिल्या टप्प्यात ७,००० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास राज्य सरकारने ३० जुलै रोजी शासन निर्णयाद्वारे अधिकृत मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे राज्यातील पात्र शेतकऱ्यांच्या कर्जमुक्ती प्रक्रियेला गती मिळणार असून, आर्थिक अडचणीत सापडलेल्या हजारो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. निधी वितरणानंतर संबंधित बँका आणि यंत्रणांमार्फत पुढील कार्यवाही सुरू होणार आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळावे आणि शेती व्यवसाय अधिक सक्षम व्हावा, या उद्देशाने ही योजना राबविली असून निधी उपलब्ध झाल्याने तिच्या अंमलबजावणीला आता प्रत्यक्ष वेग मिळणार आहे.